* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

# प्रेसनोट

दिनांक १०/०७/२०१९

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी सो यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारल्या पासुन मालमत्तेचे उघड न झालेले गुन्हे उघड करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली. सदर मोहिमेतंर्गत मा. पोलीस अधिक्षक सो यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे यांचे नेतृत्वात स्थागुशा पथकास खालील गुन्हे उघड करण्यास यश प्राप्त झाले आहे.

**शिवणी येथील ए.टी.एम चोरी करणारी आतंरराज्यीय टोळीस अटक ०७ गुन्हे उघड**

दिनांक ०८/०५/२०१९ चे रात्री २२:०० वा ते दिनांक ०९/०५/२०१९चे ०५:०० वा दरम्यान ग्राम शिवणी येथील एस.बी.आय. बँकेचे एटीएम गॅस कटरच्या सहाय्याने कापुन त्यातील १३,३०,३००/— रू चोरी करणाऱ्या आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रीक बाबीच्या तपासावरून हरियाणा राज्यातुन आरोपीत नामे **१) शाहरूख** खान सुभान खान रा. बडवा ता. जि. नुह राज्य **हरियाणा व आरोपीत नामे २) अब्बास खान आयुब** खान रा. बडवा ता.जि. नुह राज्य **हरियाणा** यांना सापळा रचुन हरियाणा येथुन अटक करून त्यांचे कडे तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे मान्य केले तसेच वाशिम जिल्हयामध्ये त्यांनी पोस्टे मंगरूळपिर हद्दीतील ग्राम शिवणी येथील एटीएम ०२वेळा गॅस कटरने कापुन चोरी केल्याचे मान्य केले. तसेच पोस्टे शिरपुर हद्दीतील ग्राम केशवनगर व पोस्टे वाशिम ग्रामिण हद्दीतील ग्राम रिठद येथील एटीएम मध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच त्यांनी पोस्टे शिरपुर हद्दीतील ग्राम केनवड येथील एटीएम तोडुन चोरी केली होती. सदर आरोपीत हे ज्या एटीएम मध्ये चोरी करावयाची आहे त्या भागाची पाहणी करून जवळच्या शहरातुन चार चाकी वाहन चोरी करून सदर चोरीच्या वाहनाचा वापर करून एटीएम मध्ये चोरी करीत होते. सदर आरोपीत यांनी पोस्टे मंगरूळपिर व पोस्टे कारंजा शहर हद्दीतुन चार चाकी वाहने चोरून ग्राम शिवणी येथील गुन्हे केले होते. सदर बाबत गुन्हे दाखल आहेत.

सदर अटक आरोपीत नामे शाहरूख खान याचे कडुन गुन्हयातील **२३,७००/— रू रोख** रक्कम व गुन्हयात वापरलेले गॅस कटर, गॅस सिलेंडर व इतर ३२,०००/— **रू किचे साहित्य** हस्तगत करण्यात आले आहेत. सदर आरोपीत हे सद्धा पोस्टे शिरपुर यांचे ताब्यात आहेत.

**किन्हीराजा येथील बँकेतील तिजोरी पळविणारे टोळी जेरबंद :—**

दिनांक ०३/०५/२०१९ रोजीचे रात्री ग्राम किन्हीराजा येथील अकोला को—ऑपरेटिव्ह बँकेतील तिजोरी काही अज्ञात आरोपीतांनी चोरी करून ती गॅस कटरचे सहाय्याने कापुन त्यातुन १४,८९,२१४/— रू चोरी करून नेले होते. सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थागुशा पथकाने करत असतांना गोपणीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून व तांत्रीक बाबीवरून सदर गुन्हयातील आरोपीत हे जालना जिल्हयातील असल्याचे निष्पण करून आरोपीत नामे १) सागरसिंग सुरजितसिंग **बावरी रा. जालना,** २) **कलदारसिंग मिकासिंग टाक रा. जालना व ३) मुकिंदरसिंग** मिकासिंग टाक रा. बिबि ता. लोणार जि. **बुलढाणा** यांना सदर गुन्हयात अटक करून त्यांचे कडुन गुन्हयातील १,६९,८००/— **रू रोख रक्कम** हस्तगत करण्यात आली आहे. सदर आरोपीत सद्धा न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.

**वाशिम जिल्हयात घरफोडी करणाऱ्या टोळीस अटक ११ गुन्हे उघड**

* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

वाशिम जिल्हयात रात्रीच्यावेळी होत असलेल्या घरफोडयावर अंकुश ठेवण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांनी विशेष मोहीम चालु केली. त्याअनुषंगाने स्थागुशा पथकाचे पोनि ठाकरे सो यांना मिळालेल्या माहितीनुसार व तांत्रीक बाबीच्या तपासातुन ग्राम चिखली झोलेबाबा येथील आरोपीत नामे १) अनिल लालुका भोसले वय ३७ वर्षे, २) अविन प्रकाश पवार वय २४ वर्षे, व ३) अमोल तिरूपन पवार वय २३ वर्षे रा. सर्व चिखली झोलेबाबा यांचे कडे तपास केला असता त्यांनी वाशिम जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी एकुण ११ ठिकाणी घरफोडया केल्याचे मान्य केले. सदर आरोपीत यांनी **पोस्टे कारंजा ग्रामिण हद्दीत ग्राम सोहळ व मांडवा, पोस्टे आसेगाव** हद्दीत ग्राम चिचखेडा व देपुळ, **पोस्टे वाशिम ग्रामिण हद्दीत ग्राम कळंबा महाली येथे तर पोस्टे मंगरूळपिर** हद्दीत ग्राम चकवा, शेलुबाजार, शेवती, पेडगाव, **तऱ्हाळा, व कंजारा** येथे घरफोडया केल्या आहेत. तसेच सदर आरोपीत यांचे कडुन एकुण २५ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत.

सदर आरोपीत यांचे कडुन आजपावेतो २,६३,५०४/— रू रोख रक्कमेचे दागीने व इतर चोरी केलेल्या १,३०,३१०/— रू रोख रक्कमेच्या वस्तु असा एकुण ३,९३,८१४/— रू **किचा माल** हस्तगत करण्यात आला आहे.

**<u>मोटार सायकल चोरी करणारे विधीसंघर्षग्रस्त ०३ बालकांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन ०४ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या :—</u>**

पोउपनि दिनकर गोरे व पथक यांना रिसोड येथील मा गंगा विदयालय येथे गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे तिन मुले मोटारसायकलसह मिळुन आले. तेथे त्यांचे पालकांना बोलावुन पालकासमक्ष विचारपुस केली असता त्यांच्या ताब्यातील मोटारसायकली हया जिंतुर जि परभणी येथुन चोरी करुन आण्ल्याची कबुली दिली. तसेच त्यांनी आणखी एक जिंतुर येथुन चोरी केलेली मोटारसायकल ही ग्राम दापुरी येथील रमेश नारायण जाधव याला विकल्याची कबुली दिली. दिलेल्या कबुलीप्रमाणे १) हिरो पॅशन प्रो मोटार सायकल जिचा चेसीस कमांक MBLHA10AWCGH32389 व इंजीन कमांक HA10ENCGH12803 २) होंडा शाईन मोटार सायकल जिचा चेसीस कमांक MEHJC36NME8012216 व इंजीन कमांक JC36E83029915 ३) हिरो पॅश प्रो मोटार सायकल जिचा चेसीस कमांक ME4JC36CHB8290813 व इंजीन कमांक JC36E2445250 ४) हिरोहोंडा पॅशन प्लस मोटार सायकल जिचा चेसीस कमांक MBLHA10EL8GD45331 व इंजीन कमांक HA10EB8GD54134 अशा वर्णनाच्या एकुण ०४ मोटारसायकली एकुण किंमती १,३०,०००/— रू. च्या मिळुणन आल्याने त्या जप्त करून पुढील कारवाई करीता पोलीस स्टेशन जिंतुर येथे कळविण्यात आले आहे.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम